झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/ झोनिआ/९६८५/२०२३
दिनांक : १३/११/२०२३

561

## अंतिम झोपडपट्टी निर्मूलन आदेश
## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये अंतिम अधिसूचना)

प्रस्तावना -

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.१७३/१ अ/२, सि.स.नं.४६६१पै, पांढारकरनगर, आकुर्डी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ २९१७.७९ चौ.मी. (प्रस्तुत अधिसूचनेत त या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. श्री. साई गुरु कन्स्ट्रक्शन्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि.२६/१०/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण १२३ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ९५, अपात्र २१ व बिगर निवासी पात्र २, अपात्र २ आणि संयुक्त पैकी संयुक्त पात्र ०, संयुक्त पैकी निवास पात्र २, संयुक्त पैकी बिगरनिवासी अपात्र ०, सार्वजनिक १ या प्रमाणे एकुण ९९ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत; आणि,

(६) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र दि.२४/०८/२०२३ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र**' म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १, गुरु ते बुध, ऑगस्ट ३१ ते सप्टेंबर ०६, २०२३ पृष्ठ क्र.८ व ९ मध्ये तसेच लोकमत व विश्वदर्पण या दैनिक वृत्तपत्रात दि.२५/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२८/०८/२०२३ रोजी डकविण्यात आला आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही; आणि

(८) ज्याअर्थी, योजनेचे विकसक यांनी उपरोक्त मिळकतीवरील झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीचे काम पूर्ण होईपर्यंत दरमहा रु.९,०००/-इतके भाडे देऊन स्थलांतरीत केलेले आहे व सदरचा भूखंड रिकामा केला आहे. तसेच सदर मिळकतीबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आमची असेल, असे हमीपत्र देखील विकसक यांनी दाखल केलेले आहे. सदर जागेतील झोपडीधारकांकरीता या प्राधिकरणाने निर्धारित केलेले दरमहा किमान भाडे रु.२,८११/- असून त्यापेक्षा जास्त भाडे देऊन विकसक यांनी सदरचा भूखंड रिकामा केलेला आहे.

(९) त्याअर्थी, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.१७३/१अ/२, सि.स.नं.४६६१पै, पांढारकरनगर, आकुर्डी, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| ठिकाण- पांढारकरनगर, आकुर्डी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१७३/१अ/२, सि.स.नं.४६६१पै | खाजगी | २९१७.७९ चौ.मी. | रस्ता | रस्ता | स.नं.१७३पै, सि.स.नं. ४६६१ पै | सि.स.नं. ४६६१/१ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १३ / ११ /२०२३.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

clean ok 09.11.23

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
२. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
३. विकसक मे. साईगुरु कन्स्ट्रक्शन - यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर.